**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठात ज्ञानयोगी स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती साजरी**
**जयंतीनिमित्त स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या दुर्मिळ छायाचित्र गॅलरीचे उद्‌घाटन**

अमरावती.

ज्ञानयोगी स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्रात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष आ.डॉ. सुनील देशमुख यांनी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, केंद्रप्रमुख डॉ. गजानन गुल्हाने, माजी महापौर श्री मिलींद चिमोटे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी आ.डॉ. सुनील देशमुख यांचे शुभहस्ते स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या दुर्मिळ छायाचित्र गॅलरीचे फित कापून उद्‌घाटन करण्यात आले. आ.डॉ. सुनील देशमुख यांना कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा देण्यात आला असून त्यांच्या या नियुक्तीबद्दल विद्यापीठातर्फे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी त्यांचा शॉल, श्रीफळ व पुस्तक देवून सत्कार केला.

सत्कार कार्यक्रमाच्या प्रास्ताविकतेतून कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी कार्यक्रमामागील भूमिका विषद केली. संचालन केंद्रप्रमुख डॉ. गजानन गुल्हाने यांनी केले. कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरु डॉ. जयकिरण तिडके, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, व्य.प. सदस्य डॉ.एस.के. ओमनवार, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी श्री मंगेश वरखेडे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे, रा.से.यो.चे प्रभारी संचालक डॉ. प्रशांत शिंगवेकर, गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे, आय.आय.एम.सी. चे संचालक श्री विजय सातोकार, विविध प्राधिकारिणींचे सदस्य, विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १४/०९/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी